## (४) शेजारती

(उदो बोला उदो अंबा० या चालीवर)

जय जय साईनाथ आतां पहुडावें मंदिरीं हो ।
आळवितो सप्रेमें तुजला आरति घेऊनि करीं हो ।
जय० ।। ध्रु० ।।

रंजविसी तू मधुर बोलुनि माय जशी निज मुला हो ।
भोगिसि व्याधी तूंच हरूनियां निजसेवकदु:खाला हो ।।
धांवुनि भक्तव्यसन हरिसी दर्शन देसी त्याला हो ।
झाले असतील कष्ट अतिशय तुमचे या देहाला हो ।।
जय० ।। १ ।।

क्षमा शयन सुंदर ही शोभा सुमनशेज त्यावरी हो ।
घ्यावी थोडी भक्तजनांची पूजनादि चाकरी हो ।।
ओवाळितों पंचप्राण, ज्योति सुमती करीं हो ।
सेवा किंकर भक्त प्रीती अत्तर परिमळ वारी हो ।।
जय० ।। २ ।।

सोडुनि जाया दु:ख वाटतें देवा त्वच्चरणांसी हो ।।
आज्ञेस्तव हा आशीर्प्रसाद घेउनि निजसदनासी हो ।
जातों आतां येऊं पुनरपि त्वच्चरणाचे पाशीं हो ।
उठवू तुजला साईमाउले निजहित साधायासी हो ।।
जय० ।। ३ ।।